RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!

मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर, प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451

बुधवार, ०७ मे २०२५ | वर्ष : ५ | अंक : १२९ | दैनिक | किंमत : ₹५/-
Wednesday, 07 May 2025 | Year : 5 | Issue : 129 | Daily | Rate: Rs. 5/-

## चार आठवड्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर करा : सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली :** गेल्या अडीच-तीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत चार आठवड्यात निर्णय घ्या, असे स्पष्ट आदेश सर्वोच्च न्यायालयाने आज महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाला दिले. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन.के. सिंग यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी झाली. न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एनके सिंह यांच्या खंडपीठाने राज्य निवडणूक आयोगाला चार आठवड्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिसूचित करण्याचे निर्देश दिले. चार महिन्यांच्या आत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश खंडपीठाने दिले. गरज पडल्यास निवडणूक आयोगाला मुदतवाढ मागण्याचे स्वातंर्त्य देण्यात आले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निकालामुळे मुंबईसह राज्यसभरातील महापालिकांच्या निवडणुका लवकरच लागण्याची शक्यता आहे. गेल्या अडीच ते तीन वर्षांपासून या निवडणुका रखडल्या आहेत. महापालिकांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांची सदस्य संख्या किती असावी, प्रभाग रचना कशी असावी आणि प्रभाग रचना, सदस्यांची संख्या राज्य निवडणूक आयोगाने ठरवावी की राज्य सरकारने आणि ओबीसी आरक्षणासहित निवडणुका व्हाव्यात की नाही आदी विविध विषयांवर सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित होती.

*सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने असे निरिक्षण नोंदवले की स्थानिक संस्था अनिश्चित काळासाठी अडखळत ठेवता येणार नाहीत आणि वेळेवर निवडणुका हे तळागाळातील लोकशाहीचे सार आहे. त्यामुळे जिथे मुदत संपली आहे किंवा प्रशासन राज असलेल्या महानगरपालिका, परिषदा, नगर पंचायती आणि जिल्हा परिषदांसाठी निवडणुका घेण्यात याव्यात, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले.* सुनावणीदरम्यान खंडपीठाने महाराष्ट्र राज्याचे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना विचारले की निवडणुका का घेतल्या जाऊ शकत नाहीत. काही तर्क आहे का? आज नोकरशहा सर्व महानगरपालिका आणि पंचायतींवर कब्जा करत आहेत आणि मोठे धोरणात्मक निर्णय घेत आहेत. या सर्व खटल्यांमुळे, संपूर्ण लोकशाही प्रक्रिया ठप्प झाली आहे. अधिकाऱ्यांची कोणतीही जबाबदारी नाही. सध्याच्या आकडेवारीनुसार निवडणुका घेण्यास परवानगी का देऊ नये? असे न्यायमूर्ती कांत यांनी विचारले.

### ओबीसी आरक्षणाचे काय होणार ?

आयोगाच्या 2022 च्या अहवालापूर्वी महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार ओबीसी समाजाला आरक्षण देऊन या निवडणुका घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. 'जे.के. बांठिया आयोगाच्या 2022 च्या अहवालापूर्वी महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार ओबीसी समुदायांना आरक्षण दिले जाईल,' असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.



### राज्यात सर्वाधिक स्था.स्व.संस्था नांदेड जिल्ह्यात

**नांदेड :** सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुकांचा मार्ग मंगळवारी खुला केल्यानंतर नांदेड जिल्ह्यातील 34 संस्थांपैकी 31 संस्थांची निवडणूक निर्धारित मुदतीत घ्यावी लागणार आहे. राज्यात सर्वाधिक स्थानिक स्वराज्य संस्था नागपूरसह नांदेड जिल्ह्यामध्ये आहेत.

## पहेलगाम प्रकरणी मल्लिकार्जुन खरगे यांची गुप्तचर विभागाच्या अहवालावरुन टीका

**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे 22 एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्याबाबत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी मोठा दावा केला आहे. पहलगाम हल्ल्याच्या तीन दिवस आधी जम्मू आणि काश्मीरमधील संभाव्य हल्ल्याबाबत पंतप्रधान मोदींना गुप्तचर अहवाल प्राप्त झाला होता. त्यानंतर पंतप्रधान मोदींनी आपला दौरा रद्द केला, असा दावा मल्लिकार्जुन खरगे यांनी केला आहे. हा गुप्तचर अहवाल प्राप्त झाल्यानंतर तीन दिवसांनी 22 एप्रिल रोजी पहलगाम येथे हल्ला झाला, असेही खरगे म्हणाले.

सरकारनेही सुरक्षा व्यवस्थेत त्रुटी राहिल्याचे मान्य केले असून पुढील काळात त्यावर काम करू, असे आश्वासन दिले आहे. पण आमचा प्रश्न असा आहे की, संभाव्य धोक्याबाबत तुम्हाला आगाऊ माहिती मिळाली असताना सुरक्षेचे योग्य ते उपाय का राबविले गेले नाहीत?, असा सवाल मल्लिकार्जुन खरगे यांनी उपस्थित केला.

सर्पपक्षीय नेत्यांच्या बैठकीत विरोधकांनी सुरक्षेसंबंधी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना म्हटले की, अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथील बैसरण पर्वतातील कुरण पर्यटकांसाठी खुले केले आहे, ही माहिती पहलगाम स्थानिक प्रशासनाने सुरक्षा यंत्रणांना दिली नव्हती.



> “ गुप्तचर यंत्रणेत त्रुटी राहिली असून सरकारने ती मान्य केली आहे. सरकारकडून पुढील काळात त्यावर उपाय योजले जातील. पण जर हल्ला होणार हे आधीपासून माहीत होते, तर त्यावर काहीच का केले गेले नाही ? मला मिळालेल्या माहितीनुसार, तीन दिवसांपूर्वीच पंतप्रधान मोदींना गुप्तचर अहवाल प्राप्त झाला होता. त्यामुळेच त्यांनी आपला काश्मीर दौरा रद्द केला. वर्तमानपत्रातूनही हे वाचायला मिळाले आहे.
>
> – मल्लिकार्जुन खरगे

### प्रधानमंत्री मोदी करणार होते रेल्वे प्रकल्पाचे उद्घाटन

एप्रिल महिन्याच्या अखेरीस पंतप्रधान मोदींचा जम्मू आणि काश्मीरचा दौरा ठरला होता. कटरा ते श्रीनगर या रेल्वे मार्गावरील रेल्वेला ते झेंडा दाखवणार होते. 19 एप्रिल रोजी नियोजित असलेला हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला होता. कटरा परिसरात वाऱ्याचा वेग वाढला असल्याचे कारण देत सदर दौरा पुढे ढकलण्यात आला होता.

जूनमधील अमरनाथ यात्रा होईपर्यंत हे कुरण बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आलेले होते.

पहलगाम येथील हल्ला होण्याच्या आदल्या दिवशी गुप्तचर यंत्रणांनी पर्यटकांना लक्ष्य केले जाऊ शकते, असा धोक्याचा इशारा दिला होता. विशेष करून श्रीनगर आणि आसपासच्या परिसरातील हॉटेल्सना लक्ष्य केले जाऊ शकते, अशीही माहिती गुप्तचर यंत्रणांकडून देण्यात आली होती.

## महाराष्ट्रातील बौद्ध समाजामुळे बोधगया मुक्ती आंदोलनास बळ मिळाले : आकाश लामा

**नागपूर :** रमाई बुद्ध विहार रमाईवाडी श्रीनगर नागपूर यांनी जनतेला महाबोधी महाविहार मुक्ति आंदोलनास मदत करण्यासाठी आवाहन केले. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला व लोकांनी 1,00,000 (एक लक्ष) निधी संकलित केली. तो निधी आंदोलक प्रमुख आकाश लामाजी यांना देण्यास विहार पदाधिकारी आदिनाथ शामकुवर अध्यक्ष, धर्मेश प्रसेनजित, राजु गोंडाने, दयानंद कांबळे, एस. सी. एन्ड बुद्धीस्ट पेन्शनर असोसिएशनचे पदाधिकारी विलास सुटे, विजय धाबर्डे, निवृती मेश्राम तसेच कश्यप माणके हे शिष्टमंडळ 30 एप्रिल रोजी खाजगी वाहनाने बुद्ध गया रवाना झाले. 2 मे 2025 ला पोहचल्यावर प्रथम महाबोधी महाविहार स्थळाला वंदन करुन बुद्ध गया जिल्हाधिकारी कार्यालयात भेटून येथे सुबोधकुमार अप्पर जिल्हाधिकारी यांना भेटून चर्चा करून बोधगया मंदिर अधिनियम 1949 अधिनियम तात्काळ रद्द करण्यास मुख्यमंत्री बिहार, प्रधानमंत्री भारत सरकार यांना निवेदनातून मागणी केली. अप्पर जिल्हाधिकारी यांने आयोजित चहापाननंतर सभा संपली. त्यानंतर महाबोधी महाविहार मुक्ति आंदोलन स्थळाला भेट दिली व आकाश लामाजी यांनी सदर महाबोधी मुक्ति आंदोलनास गती महाराष्ट्रातील बौद्ध समाजामुळे मिळाली आहे असे उद्गार उपस्थित भिख्खू संघ व उपासकांसमोर व्यक्त केले. रमाई बुद्ध विहारातर्फे संकलित निधी 1 लक्ष आकाश लामाजी यांनी सुपुर्द करण्यात आला, त्याची पोचपावती मिळाली. आकाश रामाजी यांनी मत व्यक्त करण्यास सांगितल्यामुळे धर्मेश प्रसेनजित यांनी उपस्थितांना सांगितले कि महाबोधी महाविहार मुक्ति आंदोलनाची सुरुवात महाराष्ट्रातील नागपूर मधुन आमचे बौद्ध धर्मगुरू नागार्जुन सुरई ससाई यांनी केली. त्यास पुन्हा आपण हा लढा पुढे नेत आहात, या आंदोलनास महाराष्ट्रातील संपुर्ण बौद्ध समाज तन, मन, धनाने आपल्याला सहकार्य करेल अशी अपेक्षा व्यक्त केली. रात्री बोधगया मंदिर समितीचे कार्यालयात सुद्धा निवेदन देण्यात आले. नंतर परतीचा प्रवासाला सुरुवात केली व 4 मे रविवारला रात्री 11 वाजता नागपूर येथे पोहोचलो. धम्म प्रवास सुखकर झाला.




## भारतातील जाती आधारित आरक्षण हे रेल्वेच्या डब्याप्रमाणे झाले आहे : न्यायाधीश सूर्यकांत

**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका प्रलंबित असल्याबद्दल आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने चार महिन्यात रखडलेल्या निवडणुका घ्या, असे आदेश दिले. ही सुनावणी घेत असताना न्यायाधीश सूर्यकांत यांनी आरक्षण व्यवस्थेवर भाष्य केले. ते म्हणाले, **'भारतातील जाती आधारित आरक्षण हे रेल्वेच्या डब्याप्रमाणे झाले आहे. जे लोक आधीच डब्यात चढले आहेत, ते इतरांना आत शिरू देत नाहीत.'** महाराष्ट्रात 2016-17 पासून स्थानिक स्वराज संस्थाच्या निवडणुका प्रलंबित आहेत. ओबीसी प्रवर्गाच्या राखीव जागांचा कोटा ठरविण्यावरून वाद निर्माण झाल्यामुळे या निवडणुका झालेल्या नाहीत. 2021 साली, ओबीसींना 27 टक्के आरक्षण देणारा महाराष्ट्र सरकारचा अध्यादेश सर्वोच्च न्यायालयाने रद्दबातल ठरवला होता. याचिकाकर्त्यांकडून वकील गोपाल शंकरनारायणन यांनी युक्तिवाद केला होता. ते म्हणाले, बांठिया आयोगाने स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीत ओबीसींना आरक्षण दिले. राजकीय आरक्षणाची गरज आहे की नाही? हे न तपासताच हे आरक्षण देण्यात आले. राजकीय मागासलेपण हे सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणापेक्षा वेगळे असते. ओबीसींना राजकीय मागास म्हणता येणार नाही.



> “ या देशात आरक्षणाचा व्यवसाय रेल्वेसारखा झाला आहे. जे लोक आधीच डब्यात शिरले आहेत, ते इतरांना आत घुसू देत नाहीत. हाच खेळ सुरू आहे. याचिकाकर्त्यांचाही तोच खेळ सुरु आहे. वकील शंकरनारायणन पुढे म्हणाले की, या रेल्वेला आणखी डबे जोडले जात आहेत.
>
> – न्यायाधीश सूर्यकांत

## अमेरिकेत स्थलांतरितांना घेऊन जाणारी बोट उलटून 3 जणांचा मृत्यू



**नवी दिल्ली :** अमेरिकेमधील सॅन दिएगो किनाऱ्याजवळ एका बोटचा अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. सॅन दिएगो किनाऱ्याजवळ एक बोट उलटली असून या घटनेत तीन जणांचा मृत्यू झाला आहे. सोमवारी सकाळी कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्याजवळ संशयित स्थलांतरितांना घेऊन ही बोट जात होती. पण यावेळी अचानक ही बोट उलटली आणि यामध्ये दोन भारतीय मुले बेपत्ता झाले, तर तीन जणांचा मृत्यू झाला. बेपत्ता मुलांच्या पालकांसह एकूण चार जण जखमी झाले आहेत. दरम्यान, सोमवारी रात्री तटरक्षक दलाने या घटनेची शोध मोहीम थांबवली. तेव्हा दोन मुलांसह सात जण बेपत्ता होते. सोमवारी सकाळी 6.30 वाजता सॅन दिएगो येथील टोरी पाइन्स स्टेट बीचजवळ एक बोट किनाऱ्यावर वाहून आल्याची बातमी तटरक्षक दलाला मिळाली. तेव्हा ही लहान बोट मेक्सिकन सीमेपासून सुमारे 36 किलोमीटर उत्तरेस पलटी झाल्याचं वृत्त आहे.

## विदर्भातील शिक्षकही न्यायालयात जाणार !



**अमरावती :** सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातील शिक्षकांनी नवीन संचमान्यतेच्या शासन निर्णयाला आव्हान देणाऱ्या दोन याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल केल्या आहेत. आज मुंबई येथे दोन्ही याचिकांची सुनावणी पार पडली. याचिकेतील उपस्थित केलेले मुद्दे व युक्तिवाद विचारात घेऊन उच्च न्यायालयाने शासनाला व सर्व प्रतिवाद्यांना संचमान्यतेबाबत आज आहे ती परिस्थिती ठेवण्याचे अंतरिम आदेश पारित केले. पुढील सुनावणी जून मध्ये होईल. या आदेशामुळे नवीन संचमान्यतेनुसार याचिकाकर्त्यांना अतिरिक्त ठरवता येणार नाही. 15 मार्च 2024 रोजी नवीन शिक्षकांची संचमान्यता शासन निर्णय निर्गमित करून संचमान्यतेच्या निकषात बदल केला आहे. पटसंख्येवर आधारित या निर्णयाचा मोठा फटका अनेक जिल्ह्यांना बसला आहे. पदवीधर शिक्षकांची पदे मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त ठरणार आहेत. या निर्णयाविरोधात शिक्षक संघटनांनी जुलै 2024 मध्ये शिक्षकांचे मोर्चे काढले. मार्च 2025 मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलने केली परंतु, शासनाने निर्णय बदलला नाही. त्यामुळे 193 पदवीधर शिक्षकांनी उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठात याचिका दाखल केली आहे.

## अहिल्यानगर येथील ऐतिहासिक कॅबिनेट बैठक



**चौंडी :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली अहिल्यानगर येथे ऐतिहासिक राज्य मंत्रिपरिषद घेण्यात आली होती. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. चौंडी येथे अहिल्यादेवी होळकरांचे स्मृतीस्थान जतन आणि संवर्धनाकरता कोट्यवधींचा निधी मंजूर करण्यात आला असून अहिल्यानगर येथे वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. कॅबिनेट बैठक संपल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत यासंदर्भातील माहिती दिली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदेही उपस्थित होते. 'चौंडीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्मृतीस्थळ जतन आणि संवर्धनाकरता 681 कोटींचा आराखडा मान्य केला आहे. यातून विविध प्रकारची कामे होतील. अखिल भारतीय स्तराचे एक प्रेरणास्थळ आणि तीर्थस्थळ म्हणून हे तयार झाले पाहिजे, अशा प्रकारचा प्रयत्न केला आहे.

### मंत्रिमंडळास खास कांस्य धातूच्या थाळीतून पुरणपोळी, आमरसाची मेजवानी

**अहिल्यानगर :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 300 वी जयंतीनिमित्त राज्य मंत्रिमंडळाची बैठक श्री क्षेत्र चोंडी येथे आज, मंगळवारी आयोजित करण्यात आली होती. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्यासह मंत्र्यांचे स्वागत खास धनगर समाजाची परंपरा असलेली काठी, घोंगडे, अहिल्यादेवी होळकर गौरवगाथा लोकमातेची हे पुस्तक, अहिल्यादेवी होळकर यांची मुर्ती, शाल देऊन स्वागत केले. भोजन व्यवस्थाही खास प्रकारच्या कांस्य धातूची थाळी व कांस्य धातूच्या ग्लास-वाट्यातून करण्यात आली होती. भोजनासाठी पुरणपोळी, आमरस, कर्जत गावाची ओळख असलेली शिपी आमटी, मासवडी अशा एकुण 18 प्रकारच्या खाद्यपदार्थ होते.

## राज्यातील हजारो एसटी महिला कर्मचाऱ्यांना 'डे'शिपमध्येच मिळणार काम



**नागपूर :** घरापासून लांब अंतरावर रोजच्या रोज 'नाईट दिव्य' पार पाडणाऱ्या राज्य परिवहन महामंडळातील हजारो महिलांना आता लवकरच मुक्ती मिळणार आहे. परिवहन मंत्र्यांनी एसटी कामगारांच्या अधिवेशनात या संबंधाने केलेली घोषणा एसटीतील महिला कर्मचाऱ्यांसाठी दिलासादायक ठरली आहे. मोठ्या प्रमाणात प्रवाशांची गर्दी वळल्यानंतरही विविध अडचणीमुळे एसटीला रोज अडथळ्यांची शर्यत पार पाडावी लागते. बहुतांश ठिकाणच्या एसटी बस स्थानकांवर चालक, वाहकांसाठी चांगले विश्रांती गृह, स्वच्छतालये नाहीत. त्यामुळे दिवसरात्र ड्युटी करणाऱ्या चालक वाहकांना घरून निघाल्यापासून घरी पोहचेपर्यंत मोकळेपणाने विश्रांती घेता येत नाही. या पार्श्वभूमीवर, मानगाव, रायगड येथे एसटी कामगार संघटनेच्या 57 व्या अधिवेशनात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सोमवारी, 5 मे रोजी एसटीतील महिला कर्मचाऱ्यांना रात्री 8 नंतर कर्तव्य, अर्थात नाईट ड्युटी दिली जाणार नाही, अशी घोषणा केली. ही घोषणा एसटीत वाहक म्हणून काम करणाऱ्या हजारो कर्मचारी महिलांसाठी कमालीची सुखद ठरली आहे. कारण परिवहन मंत्र्यांच्या घोषणेनुसार आता त्यांना मिळणारी नाईट ड्युटी दिली जाणार नाही.

## विकास आराखड्यात धार्मिक स्थळांमध्ये बुद्ध विहारांना स्वतंत्र 'उपवर्ग' म्हणून समाविष्ट करा : डॉ. नितीन राऊत

**नागपूर :** महाराष्ट्रातील शहरी भागासाठी तयार होणाऱ्या विकास आराखड्यांमध्ये धार्मिक स्थळे वर्गीकृत करण्यात आलेली आहेत. यामध्ये मंदिर, मशीद, चर्च, गुरुद्वारा, मठ इत्यादींचा समावेश करण्यात आला आहे.

याबाबत अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग-1, मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना त्यांनी पत्र पाठवून मागणी केली आहे.

पत्र क्रमांक टी.पी.एस./1818/1489/प्र.क्र. 303/18, दिनांक 17/06/2019. नुसार संदर्भांकित विषयाच्या आणि GIS डेटा स्ट्रक्चर दस्तऐवजाच्या अनुषंगाने, महाराष्ट्रातील शहरी भागासाठी तयार होणाऱ्या विकास आराखड्यांमध्ये धार्मिक स्थळे 'वर्ग 16 (Religious Sites)' अंतर्गत वर्गीकृत करण्यात आलेली आहेत.

डॉ. नितीन राऊत यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले की भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 25 च्या स्पष्टीकरण 2(ब) मध्ये नमूद केले आहे की, 'हिंदू' या शब्दाचा अर्थ शीख, जैन किंवा बौद्ध धर्म मानणाऱ्या व्यक्ती तसेच हिंदू धार्मिक संस्थांच्या संदर्भातही असाच अर्थ लावला जाईल. असे असूनही, उक्त विकास योजना तयार करताना, बौद्ध (बुद्ध विहार) आणि जैन (देरासर किंवा बसदी) धार्मिक स्थळांचा स्वतंत्रपणे समावेश करण्यात आलेला नाही. जीआयएस डेटा स्ट्रक्चर डॉक्युमेंटेशनच्या पान क्र. 66 वरील नोंद 4 नुसार, नगर रचना संचालकांना वर्गीकरणामध्ये विस्तार/बदल करण्याचा अधिकार आहे. या अधिकाराचा उपयोग बुद्ध विहारांना स्वतंत्र 'उपवर्ग' मध्ये समाविष्ट करण्यासाठी केला जावा.

याव्यतिरिक्त, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना अधिनियम, 1966 नुसार, विकास योजनांमध्ये महत्त्वपूर्ण सांस्कृतिक आणि धार्मिक स्थळांचा समावेश करणे अनिवार्य आहे. करिता राज्यातील बुद्ध विहारांना तद्वस डेटा स्ट्रक्चरमध्ये स्वतंत्र 'उपवर्ग' म्हणून समाविष्ट करावे, जेणेकरून त्यांचे सांस्कृतिक, धार्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व विकास आराखड्यात योग्य प्रकारे प्रतिबिंबित होईल आणि त्यांच्या संरक्षण, प्रचार आणि प्रसारासाठी योग्य पावले उचलता येतील. यासाठी संदर्भातील शासन परिपत्रकात आवश्यक दुरुस्ती करून सुधारणा परिपत्रक (Corrigendum) जारी करावे, अशी मागणी डॉ नितीन राऊत यांनी केली आहे.

> महाराष्ट्रात बौद्ध लोकसंख्या लक्षणीय असूनही विविध वस्त्या, मोहल्ले, गावे आणि वाड्यांमध्ये असलेल्या बुद्ध विहारांचा स्वतंत्र 'उपवर्ग' म्हणून समावेश करण्यात आलेला नाही. परिणामी, बौद्ध धार्मिक आणि सांस्कृतिक स्थळांना विकास योजनांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व मिळत नाही. यामुळे त्यांचे संरक्षण, विकास निधी आणि कायदेशीर संरक्षणांमध्ये अडचणी येतात. त्यामुळे राज्यातील शहरी भागाच्या विकास आराखड्यात धार्मिक स्थळांमध्ये बुद्ध विहारांना स्वतंत्र 'उपवर्ग' म्हणून समाविष्ट करा.
>
> – डॉ. नितीन राऊत







संत गाडगेबाबा बहुउद्देशीय आश्रम जरूड
बुद्ध विहार समन्वय समिती द्वारा आयोजित

**बाल संस्कार एवं व्यक्तिमत्व विकास शिबीर**
**राष्ट्रीय पालि भाषा प्रशिक्षण शिबीर**

रविवार २५ मई से १ जून, २०२५ आठ दिवसीय निवासी शिबीर
शांतीवन चिंचोली (फेटरी) नागपूर (महाराष्ट्र)

बाल संस्कार एवं व्यक्तिमत्व विकास शिबीर ( १०० बाल-बालिका, उम्र १३ से १६ साल )
राष्ट्रीय पालि भाषा प्रशिक्षण शिबीर ( ५० भारत के नागरिक, उम्र १८ से ७० साल, अंग्रेजी, हिंदी, मराठी भाषामें

* पालि भाषा प्रशिक्षक *
आचार्य राजेंद्र भालशंकर (नाशिक)

* मुख्य संयोजक *
सतिश गायकवाड / बबिता गायकवाड
८९९९९६०७९३ / ९९७००८३४३७ / ९६६५६१४३४१

* मुख्य आयोजक *
अशोक सरस्वती बौद्ध / प्रा. डॉ. प्रमिला चिंचखेडे
मो. ८५३०९८०७४१ / ८७८८६०७३२३

आपली नाव नोंदणी करा. (निशुल्क)
अपना नाम दर्ज करने की कृपा करे (निशुल्क)



“ मुल्यांनुसार वागणे म्हणजेच जीवनाचा खरा आदर्श दाखवणे. ”

बहुजन सौरभ

BAHUJAN SAURABHA



# तरूणांनी आर्थिक साक्षर होण्याची गरज

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि रिझर्व्ह बँक हिल्टन यंग कमिशन यांच्या शिफारशींच्या आधारे भारतात 1 एप्रिल 1935 रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. भारतीय अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' असल्याने. या बँकेच्या जन्मकथेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचाही मोलाचा वाटा आहे.**

ब्रिटिश कालखंडात चलनाच्या मूल्यासाठी सुवर्ण विनिमय पद्धतींचाच अवलंब करण्याचा घाट ब्रिटिश सरकारने घातला. त्याला विरोध करत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारता सारख्या तत्कालीन अविकसित देशासाठी किती घातक असल्याचे दाखवून दिले होते. उलट त्यांनी रुपयाच्या अवमूल्यनाचीच मागणी केली होती. डॉ. बाबासाहेब यांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या गंगाजळीची कल्पना सुचली त्यात रमाईचे योगदान आहे. कारण पत्नी रामूच्या काटकसरीतून केलेली बचत संकट समयी उपयोगी येत असे. डॉ. बाबासाहेब यांनी 'दी प्रॉब्लेम ऑफ द रुपी - इट्स ओरिजिन अँड इट्स सोल्यूशन' या पुस्तकात 'रुपयाची सर्वसाधारण क्रयशक्ती जोपर्यंत आपण स्थिर करीत नाही तोपर्यंत रुपयाची किंमत अन्य कोणत्याही मार्गाने स्थिर होऊ शकत नाही. विनिमय पद्धतीत चलनाच्या दुखण्याची लक्षणे तेवढी कळू शकतात, त्यात उपचार होऊ शकत नाहीत.' असे स्पष्ट मत मांडले होते. डॉ. बाबासाहेबांनी केलेल्या विरोधामुळेच या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी ब्रिटिशांनी 'रॉयल कमिशन'ची स्थापना केली. त्यावेळी उपस्थित केलेल्या अनेक अर्थशास्त्रीय प्रश्नांमधून 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया' ही आजच्या अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेली अर्थव्यवस्था जन्माला आल्याचे मत 'लोकसत्ता'ने त्यांच्या अर्थशास्त्री आंबेडकर! 2016 सालच्या संपादकीयात व्यक्त केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ओळख भारतीय राज्यघटनेचे जनक आणि दलित पुढारी अशी असली तरी त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात अर्थशास्त्रज्ञ म्हणून केली होती. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठ आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समधून त्यांनी अर्थशास्त्र या विषयात पदवी संपादन करून तत्कालीन भारतीय अर्थशास्त्रज्ञांपैकी सर्वोत्तम अशी ख्यातीही संपादन केली होती. किंबहुना त्यांनी मांडलेले संशोधन हे आजही अनेक प्रसंगी महत्त्वाचे ठरत आहे. डॉ. बाबासाहेब यांचे अर्थशास्त्रीय लेखनापैकी 'ॲडमिनिस्ट्रेशन अँड फायनान्स ऑफ दी ईस्ट इंडिया कंपनी', 'दी इव्होल्यूशन ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया' आणि 'दी प्रॉब्लेम ऑफ द रुपी - इट्स ओरिजिन अँड इट्स सोल्यूशन' हे तीन ग्रंथ प्रमुख आहेत.

लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये सादर केलेला डॉ. बाबासाहेबांचा प्रबंध हाच नंतर 'द प्रॉब्लेम ऑफ द रुपी -इट्स ओरिजिन ॲण्ड इट्स सोल्युशन' या पुस्तकाच्या स्वरूपात प्रकाशित झाला. हे पुस्तक पहिल्यांदा 1923 साली प्रकाशित झाले होते. हा प्रबंध लिहिताना डॉ. बाबासाहेबांना प्रा. जॉन केन्स यांच्याशी दोन हात करावे लागले होते. प्रा. जॉन केन्स हे अर्थशास्त्रातले मोठे नाव किंवा जाणते व्यक्तिमत्व. 20 व्या शतकातील प्रसिद्ध ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ अशी त्यांची ओळख. या विषयातील त्यांचा शब्द प्रमाण मानावा, असा त्यांचा दबदबा होता. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेतल्याशिवाय संशोधन पूर्णच होऊ शकत नव्हते. असे असले तरी खरा संशोधक तोच जो आपल्या सिद्धांताच्या पूर्तीसाठी कोणतेही आव्हान पेलू शकेल. तेच डॉ. बाबासाहेबांनीही केले. प्रा. जॉन केन्स यांच्या मताला आव्हान दिले.'चलनाच्या मूल्यासाठी सुवर्ण विनिमय पद्धतीचाच अवलंब करायला हवा, या मताचे प्रा. जॉन केन्स होते. सुवर्ण विनिमय पद्धतीत देशाच्या चलनाच्या मूल्याची सांगड ही सोन्याच्या मूल्याशी घातली जाते. या पद्धतीचा अवलंब करणारे देश आपल्या कागदी चलनाचे रूपांतर निश्चित दराने सोन्यामध्ये करून ठेवतात. तसेच अशा देशांत सोन्याची किंमत सरकार निर्धारित करते. परंतु सुवर्ण प्रमाण पद्धतीत मात्र प्रत्यक्ष चलनात काही प्रमाणात सोने वापरले जाते. पारतंत्र्यातील भारतात सुवर्ण विनिमय पद्धतीने रुपयाची हाताळणी केली जावी, असे ब्रिटिश सरकार आणि प्रा. केन्स आदी प्रभृतींचे मत होते.' हे मत डॉ. बाबासाहेबांनी थेट खोडून काढले. भारतासारख्या अविकसित देशात सुवर्ण विनिमय पद्धती अयोग्य आहे, हे डॉ. बाबासाहेबांनी सिद्ध केले.



आनंद म्हस्के

मो. 8652325032

ईस्ट इंडिया कंपनीचे प्रशासन, वित्तव्यवस्था कशी होती, त्याची वैशिष्ट्ये, महसुलाची वैशिष्ट्ये-पद्धत-खर्च अशा विविध प्रश्नांवर डॉ. बाबासाहेबांनी प्रकाशझोत टाकला आहे. ब्रिटिश सरकारच्या भारतातील कामगिरीचे विवेचन करतांना डॉ. बाबासाहेब म्हणतात, 'भारताने इंग्लंडसाठी केलेले योगदान इतके हे जेवढे थक्क करणारे आहे. तेवढे इंग्लंडने भारतासाठी केलेले विस्मयकारी आहे.ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड फायनान्स ऑफ दि ईस्ट इंडिया कंपनी या ग्रंथात 1792 ते 1858 या कालखंडातील ब्रिटिशकालीन वित्तव्यवहारावर भाष्य करण्यात आले आहे. तर दि इव्होल्यूशन ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया या ग्रंथात वित्तीय व्यवहारांमधील केंद्र आणि राज्य संबंधांवर भाष्य केले आहे.

डॉ. बाबासाहेबांनी कोलंबिया विद्यापीठातील प्रबंध जागतिक ख्यातीचे एडविन सेलिग्मन यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला होता. या प्रबंधाचा विषय राज्य आणि केंद्र यांच्यातील आर्थिक संबंधांवर आधारित होता. या प्रबंधात डॉ. बाबासाहेबांनी, 'एका सुदृढ प्रशासकीय व्यवस्थेमध्ये प्रत्येक राजकीय घटकाने दुसऱ्या घटकावर जास्त अवलंबून न राहता,




स्वतःची संसाधने वाढवून आपला खर्च भागवता आला पाहिजे, असा युक्तिवाद केला. रुपया आणि सार्वजनिक वित्ताबाबत डॉ. आंबेडकरांनी मांडलेले विचार हे तत्कालीन उग्र आर्थिक समस्यांना दिलेला प्रतिसाद होता. त्यांनी मांडलेली अनेक तत्त्वे आजही प्रासंगिक आहेत 1918 साली इंडियन इकॉनॉमिक सोसायटीच्या जर्नलमध्ये शेती आणि शेतजमीन (स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया अँड देअर रेमिडीज) यावरील एक शोध निबंध डॉ. बाबासाहेबांनी प्रकाशित केला. या निबंधात त्यांनी भारतातील शेतीविषयक मूलभूत समस्या मांडल्या आहेत. त्या कालखंडात विवाद ठरलेल्या जमिनींचे एकत्रिकरण आणि विस्तार करण्याच्या विविध प्रस्तावांची तपासणी करण्यासंदर्भात असे प्रस्ताव सदोष असल्याचे निरीक्षण डॉ. आंबेडकर यांनी मांडले. शेतीची धारण क्षेत्रे हा भारतीय शेतीसाठी गंभीर विषय असल्याचे त्यांनी नमूद केले. जमिनीच्या आकारमानामुळे शेतीच्या उत्पादनावर परिणाम होतो. यावर उपाय म्हणजे शेतीचे राष्ट्रीयकरण असे त्यांनी सुचविले. 1937 साली त्यांनी खोती जमीनदारी पद्धत रद्द करणारे पहिले विधेयक मांडले. भांडवलाचा साठा वाढवणे हे खरे आव्हान आहे आणि हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा अर्थव्यवस्थेत जास्त बचत होईल. जोपर्यंत लोकांचा मोठा समूह त्यांच्या उपजीविकेसाठी जमिनीवर अवलंबून आहे तोपर्यंत हे शक्य नाही, असाही तर्क त्यांनी मांडला. त्यामुळे त्यांनी औद्योगिकीकरण हे भारताच्या कृषी समस्येचे उत्तर असल्याचे स्पष्ट केले.

डॉ. आंबेडकरांनी अर्थतज्ज्ञ म्हणून मांडलेल्या सिद्धांतांपैकी हे काही प्रातिनिधिक मुद्दे असले तरी डॉ. बाबासाहेबांचे कार्य फार विस्तृत आहे. जाणवणारा द्रष्टेपणा त्यांच्या विद्वत्तेची प्रचिती देतो. डॉ. बाबासाहेबांनी अर्थशास्त्रीय गृहीतके मांडताना समाजातील गरीब वर्गाचा सर्वांगाने विचार केला. आज 21 व्या शतकात अर्थशास्त्र या विषयातील नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन यांनीही गरिबांचे अर्थशास्त्र मांडले, म्हणूनच ते डॉ. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपले गुरु मानतात. डॉ. बाबासाहेब यांनी स्वातंत्र्य भारताचे अर्थमंत्री होण्याची फार इच्छा होती. त्यांनी तसे आपले मत जाहिर करताना म्हटले होते की, माझ्याकडे अर्थखाते दिले तर देशाचा अर्थव्यवस्थेची घडी अशी बसवेन की, येणाऱ्या पुढील 25 वर्षात देशावर आर्थिक कितीही संकट आली तरी देशाचा अर्थ व्यवस्थेची गाडी रुळावरून खाली येणार नाही अशी व्यवस्था करून ठेवतो. परंतु पंडित नेहरूंनी त्यांना संविधान निर्माते म्हणून कायदे मंत्री केले आणि सी. डी. देशमुख यांना अर्थमंत्री करण्यात आले. तेच सी. डी. देशमुख वेळोवेळी डॉ. बाबासाहेब यांचा सल्ला घेत होते.

जगातील महान अर्थतज्ज्ञ डॉ. बाबासाहेब यांचे आम्ही वारस देशाच्या आणि राज्याच्या अर्थ व्यवस्थेवर आणि बजेटवर किती बोलतो, लिहितो आणि समाज जागृतीसाठी आर्थिक कार्यक्रम राबवित नसल्याने SC, ST, OBC आणि आदिवासींची बजेट मधील रक्कम इतर ठिकाणी वर्ग केली जात आहे. त्याला कोणी विरोध करीत नाही. की आंदोलन करीत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारत देशाला शेअर बाजारची पहिली ओळख करून दिली.

शुक्लाजी इस्टेट मध्ये त्यांनी ऑफिस खोले त्याला. चांगला प्रतिसात मिळत असताना डॉ. आंबेडकर अस्पृश्य जातीचे माहित होताच सर्वांनी त्याकडे पाठ फिरवली. आपल्या बापाने देशाला ओळख करुन दिलेल्या शेअर मार्केट मध्ये आजही आम्ही किती तरुण आहे? उद्योग निर्मितीमध्ये किती तरुण आहेत? सगळ्याचे सोंग करता येते पण पैसाचे सोंग करता येत नाही. म्हणून तरुणांनी देशाची अर्थ व्यवस्था देशाच बजेट औद्योगीकरण, शेअर मार्केटवर परिसंवाद आयोजित करून बहुजन समाजाला आर्थिक साक्षरब करण्याची गरज आहे. ■ ■

## दगड आणि आरसा

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर

मो. 9370061677

त्यांचा वडीलोपार्जीत शेतीचा व्यवसाय. ते स्वतः अशिक्षित होते. पण आपल्या लेकरांनी शिकावे खूप मोठे व्हावे अशी त्यांची तळमळ. त्यांनी त्यांचे ते स्वप्न साकारही केले. मुले मोठ्या पदांवर पोहोचली. पण त्यांना मात्र हल्ली आपल्या आईवडिलांच्या अशिक्षितपणाची अन् राहणीमानाची लाज वाटायची. ते त्यांच्यापासून सतत अलिप्त राहायचा आटोकाट प्रयत्न करायचे. वडिलांच्या ही गोष्ट लक्षात यायला उशीर लागला नाही. संबंध विकोपाला जाऊ नये म्हणून काळाची पावले ओळखून ते ही अलिप्त राहू लागले. पण म्हणतात ना आईची माया फार वेडी असते. एके दिवशी ती म्हणाली, 'अहो! लेकरे आहेत. कधी-कधी चुकतात. पण त्यांच्या चुका मायबाप म्हणून आपण पोटात घालायला हव्या. देतील ते थोडी वाईट वागणूक, पण आपण दुर्लक्ष करायचे. आपण असे वागलो तर जग काय म्हणेल?' त्यावर ते म्हणाले, 'तुला काय वाटते, मी त्यांच्यावर प्रेम करीत नाही? माझाही जीव तुटतो त्यांच्यासाठी, पण आता असे वाटतेय हे कोणते शिक्षण जेथे माणसांच्या कपड्यांवर त्यांचे नाते अवलंबून आहे. ज्यांना मायबापाच्या खराब कपड्याची शरम वाटते. त्यांना डोक्यातील खराब विचारांचीही शरम वाटायला हवी. स्वाभिमानाला गहाण ठेवून मोठे होण्यापेक्षा अभिमानाने लहान रहाणे हे कधीही चांगले आहे. जग काय म्हणते यापेक्षा आपला अंतरात्मा काय म्हणतो ते महत्त्वाचे आहे. लोक म्हणतात नाते हे प्रेम अन् जिव्हाळ्यामुळे टिकते. पण मला वाटते हे अर्धसत्य आहे. नाते समोरच्याला टिकवायचे असले तरच ते टिकते. संपूर्ण जगाला उर्जा देणाऱ्या वाऱ्यालाही वेळप्रसंगी आपली दिशा बदलावी लागते. तसेच बरेचदा माणसालाही इच्छा नसतांना स्वतःत बदल करावे लागतात. मी कसे वागावे? काय करावे? हे मी ठरवू शकतो. पण तू कोणते निर्णय घ्यावे याचा तुला पूर्ण अधिकार आहे. मी त्यामध्ये कधीही आडकाठी आणत नाही. हे एवढ्या वर्षाच्या आपल्या सहवासातून तुलाही समजते. तू जे काही करशील त्याला माझी काहीही हरकत नाही. आपली मुले जशी विद्यापीठातून शिकली तसा मीसुद्धा जगाच्या विद्यापीठाचा विद्यार्थी आहे. त्यांच्यात अन् माझ्यात फरक एवढाच आहे की, त्यांना शिक्षकांनी शिकवले अन् मला परिस्थितीने शिकवले. आयुष्यभर स्वाभिमानाने जगलो या अखेरच्या वळणावर अपमानास्पद जीवन जगायचे तरी कशासाठी? केवळ भावनेच्या आहारी न जाता कधीतरी एकांतात बसून हा विचार करावा की, कुणाच्या आयुष्यात माझ्या नसण्याने सर्वात जास्त कुणाला फरक पडतो? ज्या लोकांना तो पडतो त्यांच्यासाठी जगावे, त्यांना सर्वस्व अर्पण करावे. इतरांना जे करायचें ते त्यांना करू द्यावे. त्यामुळे ते ही आनंदात राहातात अन् आपणही. लक्षात ठेव! मी केवळ अलिप्तता ठेवत आहे. मनात कटूता नव्हे. याचा अर्थ मी नाते तोडले असाही होत नाही. माझ्या मुलांना माझ्या कपड्यांची अन् अशिक्षितपणाची लाज वाटते. पण माझ्या प्रेमाची लाज वाटत नाही याची मला जाणीव आहे, म्हणूनच माझे असे मत आहे की, दगड आणि आरसाही एकत्रपणे आनंदात नांदू शकतो. अट एवढीच आहे की त्यांनी एकमेकांपासून सुरक्षीत अंतर ठेवावे. बहुजन सौरभ

# शाळा वाचवा, शिक्षण वाचवा - विद्यार्थी वाचवा, शिक्षक वाचवा

*पुन्हा एकदा गुलामगीरी..!*
*मुलांच्या शाळा विकल्या पालकांनो जागे व्हा!*
*बहुजनांची अंतीम लडाई!*

***आजची गोष्ट नाही, तर दोन हजार वर्षापासुन बहुजन भारतीयांचा एकच दुश्मन आहे... दुश्मन सर्वांनाच माहित आहे.. आज ही तो दुश्मन बहुजन भारतीयांना गुलाम बनविण्याचे आपले कट कारस्थान अविरतपणे करित आहे. बहुजन भारतीयांना शिक्षणापासुन वंचित करणे, त्यांना संपत्तीपासुन वंचित करणे, सर्वच मानवी अधिकारांपासुन वंचित करणे, असे धोरण मनुस्मृतिमध्ये लिखित आहे, वाचा...***

दुश्मन मनुस्मृति लागु करण्याकरिता मोठ्या नियोजनबद्ध पद्धतिने बहुजन भारतीयांचे अधिकार नष्ट करित आहे. बहुजन भारतीयांना महापुरुषांच्या 108 वर्षांच्या संघर्षातुन संविधानात मिळालेले सर्व अधिकार दुश्मनाने शुन्य केलेले आहेत. दुश्मन आमचे शिक्षण बंद करित आहे, आमच्या विद्यार्थ्यांच्या स्कॉरलशिप बंद केलेले आहे, सरकारी नोकऱ्या बंद करून प्रायव्हेट कंपन्यांमार्फत वेठबिगारी सुरु केली आहे, आमच्या उरल्या सुरल्या शेत जमिनी हडपण्याचे कृषी कायदे केलेले आहेत, जि. प.च्या सर्व शाळा प्रायवेट कंपन्यांना विकण्याचा व क्लास-1 ते क्लास-4 ची सर्वच सरकारी पदे कंत्राटी पद्धतिने भरण्याचा 6सप्टें. 2023 चा जीआर जो जनसामान्यांच्या संघटित विरोधामुळे रद्द झालेला होता, तो जीआर जानेवारी 2024 ला मनुवाद्यांनी पुन्हा लागु केलेला आहे, शाळा प्रायवेट कंपन्यांना विकल्या नंतर गावांगावातील आमच्या बहुजन भारतीयांच्या मुलांना या प्रायवेट कंपनीच्या शाळेत मोठी फिस भरुन प्राथमिक शिक्षण घ्यावे लागेल, जो फिस भरू शकणार नाही तो प्राथमिक शिक्षण घेऊ शकणार नाही. प्रायवेट कंपन्यांना शाळा विकण्याच्या जीआरला जनसामान्य बहुजनांचा आजच प्रखर विरोध झाला पाहिजे, अन्यथा गुलामगीरी निश्चित आहे... कारण प्रायवेट कंपन्यांचा उद्देश्य केवळ नफा कमावण्याचा असतो. सरकारची जवाबदारी लोककल्याणाची असते, जनसामान्य लोकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची जवाबदारी सरकारची आहे, प्रायव्हेट कंपन्यांची नाही.

प्रायव्हेट कंपनीला शाळा, शाळेची जमिन व इतर मालमत्ता लाखो रूपयांना विकल्या नंतर, विकत घेतलेल्या शाळेतुन प्रायव्हेट कंपनी नफा कमावण्याचा आपला व्यापार, धंधा सुरु करेल. एका प्रायव्हेट कंपनीने विकत घेतलेल्या शाळेत चक्क नट्यांचा नाच ठेवुन पैसे कमावले, हि वास्तविकता आहे. जसे जीओ कंपनीने लोकांना एक वर्ष सीम व नेट मोफत दिले होते, आज मात्र सर्वात जास्त रिचार्ज दर जीओ कंपनीचे आहेत. याच धर्तीवर प्रायव्हेट कंपनी शाळेतील विद्यार्थ्यांना पहिल्या वर्षी सर्वांना मोफत शिक्षण देतील, जेणे करून शाळा विकत घेणाऱ्या प्रायव्हेट कंपन्यांना पालकांचा विरोध होऊ नये. दुसऱ्या वर्षी प्रायव्हेट कंपनी शाळेतील विद्यार्थ्यांवर फक्त 10/- रू. प्रती विद्यार्थी फी आकारेल तेव्हा पालक 10/- फी देतील, याचा अर्थ पालक प्रायव्हेट कंपन्यांना फी देण्यास तैयार आहेत, असा अर्थ होईल. तिसऱ्या वर्षी प्रायव्हेट कंपनी शाळेतील प्रती विद्यार्थ्यांवर 100/- रू. फी आकारेल तेव्हा पालक फी भरतील, आता चौथ्या वर्षी प्रायवेट कंपनी शाळेतील प्रती विद्यार्थ्यांवर 1000/- रू. फी आकारेल तेव्हा काही पालक प्रायव्हेट कंपनीच्या विरोधात कुजबुज करतील. परंतु वेळ निघुन गेलेली असेल. पाचव्या वर्षी प्रायव्हेट कंपनी शाळेतील प्रती विद्यार्थ्यांवर 10,000/- रू. फी आकारेल तेव्हा मोजकेच पालक फी भरतील व बरेच पालक फी भरू शकणार नाहीत, जे पालक फी भरणार नाहीत त्यांच्या मुलांना प्रायव्हेट कंपनी शिक्षण देणार नाही. या पाचव्या वर्षी काही पालक प्रायव्हेट कंपन्यांचा विरोध करू लागतील. परंतु खूप वेळ निघुन गेलेली असेल. प्रायव्हेट कंपन्यांच्या विळख्यात महाराष्ट्रातील सर्व जि.प. व सरकारी शाळा अडकलेल्या असतील तेव्हा जनसामान्य लोक प्रायव्हेट कंपन्यांचा विरोध ही करू शकणार नाहित. भविष्यातील हा धोका ओळखुन जनसामान्य बहुजनांनी करो या मरोची भुमिका घेऊन मनुवाद्यांचा हा काळा जीआर पेटवुन, प्रतिकात्मक होळी करून कंत्राटी पदभरतीचा व प्रायव्हेट कंपन्यांना शाळा विकण्याचा प्रखर विरोध आजच केला पाहिजे...!

जेव्हा जुनी पेंशन बंद करण्यात आली होती, तेव्हाच प्रखर विरोध झाला असता तर जुनी पेंशन योजना बंद करने मनुवाद्यांना शक्य झाले नसते. जुनी पेंशनच्या बाबतीत आजची परिस्थिती जनसामान्यांच्या आवाक्याच्या बाहेर आहे. पुढे सहाव्या वर्षी प्रायव्हेट कंपनी शाळेतील प्रती विद्यार्थ्यांवर 10,000/- रू. प्रती महिना फी आकारेल, तेव्हा त्यांना कुणीही रोखु शकणार नाहीत, खुद्द न्यायालयही रोखु शकणार नाही कारण प्रायव्हेट कंपन्यांना अनुकूल असे कायदे मनुवाद्यांनी पूर्वीच बनवुन ठेवलेले आहेत. जे पालक प्रायव्हेट कंपन्यांची फी भरू शकणार नाहीत, त्यांच्या मुलांचे शिक्षण बंद करून स्किल डेव्हलपमेंटच्या नावाखाली चप्पला-जोडे कसे शिवायचे, टेबल कसे बनवायचे,...अशा बारा बलुतेदार प्रकारच्या कामांचे प्रशिक्षण दिले जाईल. जनसामान्य बहुजनांची मुले फक्त कामगार बनतील. जनसामान्य बहुजनांची मुले चुकूनही कुणी अधिकारी बनु शकणार नाही. जनसामान्य बहुजनांची खुप हुशार, प्रतिभावान व होतकरू मुले चुकूनही मोठ्या पदावर जाऊ नयेत अशी मनुस्मृतीची व्यवस्था प्रस्थापित करायला सुरूवात झालेली आहे. प्रायव्हेट कंपन्यांना शाळा विकणारा व कंत्राटी पदभरतीचा जीआर सरकारने लागु केलेला आहे. या काळ्या जीआरचा प्रखर विरोध करण्याची जवाबदारी आम्हा जनसामान्य बहुजनांच्या दारावर येऊन ठेपली आहे...

सावधान.... झोपु नका...जागे व्हा... सक्रिय व्हा...!

आम्हा जनसामान्य बहुजनांच्या मुलांना व येणाऱ्या हजारों पिढ्यांना गुलामीची जाणीव सुद्धा होणार नाही व आमची मुले कायमची वेठबिगारीच्या खाईत ढकलल्या जातील अशी दीर्घकालीन गुलामगीरीची व्यवस्था जनसामान्य बहुजनांवर थोपणाऱ्या विषारी मानसिकतेतून कंत्राटी पदभरती व प्रायवेट कंपन्यांना शाळा







विकण्याचा जीआर लागु करून मनुस्मृति व्यवस्था प्रस्थापित करण्याचा नियोजनबद्ध कार्यक्रम मनुवादी राबवीत आहेत. उच्च शिक्षण तर आमच्या आवाक्याच्या बाहेर होणार आहेच, लिहुन ठेवा मनुस्मृति जशीच्या तशी लागु करण्याची सुरूवात झालेली आहे.

फुले-शाहू-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात मनुस्मृति लागु करण्या इतपत दुश्मनाची हिम्मत वाढलेली आहे, महाराष्ट्रात दुश्मन सफल झाला तर हे संपूर्ण देशात लागु करतील.

सरकारने एकुण बजेटच्या 10.5 टक्के रक्कम शिक्षणावर खर्च करण्याची अर्थसंकल्पात तरतुद असतांना शिक्षणावर केवळ 2.5 टक्के खर्च केले जाते. मनुवादी पैसा नाही असा खोटा प्रचार करून जनसामान्य बहुजनांची दिशाभुल करीत आहेत, सरकार प्रत्येक व्यक्ति वर, प्रत्येक सामानावर, प्रत्येक सेवेवर, प्रत्येक खरेदीवर व प्रत्येक विक्रीवर कर (टॅक्स) आकारतो सरकारने एक रूपया जरी टॅक्स वाढविला तरी एका दिवशी लाखों करोडों रूपये शासनाच्या तिजोरीत जमा होतील. प्रश्न पैशाचा नाही तर प्रश्न मनुवाद्यांच्या मानसिकतेचा आहे. महात्मा फुलेंनी मनुवाद्यांच्या गुलामगीरीतुन जनसामान्य बहुजनांच्या आजादीचा आंदोलन सुरु केला, हा आंदोलन 108 वर्षे डॉ. बाबासाहेबांपर्यंत सुरु राहिला. शेवटी संविधानातुन मोफत व सक्तीचे शिक्षण तसेच अनेक मानवीय अधिकार जनसामान्य बहुजनांना मिळाले, त्यामुळे जनसामान्य बहुजनांची होतकरू मुले मोठ्या पदावर जाऊन बसली. जनसामान्य बहुजनांची संख्येने अत्यंत कमी मुले मोठ्या पदावर आहेत. जनसामान्य बहुजनांची हि थोडीसी प्रगती मनुवादी दुश्मनाला पचनी पडली नाही. मनुवाद्यांना त्यांच्या बरोबरीने जनसामान्य बहुजन खुर्ची लावुन बसलेला सहन सुद्धा होत नाही, इतकी विषारी मानसिकता आपल्या दुश्मनामध्ये आजही तुडुंब भरलेली आहे. मनुवाद्यांच्या या विषमतावादी विषारी मानसिकतेतुन आज महाराष्ट्र सरकारने शाळा प्रायवेट कंपन्यांना विकणारा व सर्व सरकारी पदे प्रायवेट कंपन्यांमार्फत भरून वेठबिगारी लादणारा व संविधानांने बहाल केलेले मानवीय अधिकार व संवैधानिक व्यवस्था उद्ध्वस्त करणारा काळा जीआर सरकारने पुन्हा लागु केलेला आहे... अशा मनुवादी सरकारचा निषेध असो...! आता आपण काय करावे...?

आम्ही भारताचे लोक, हि संविधान प्रस्तावनेची पहिलीच लाईन आहे, वाचा.

कोणत्याही देशात त्या देशातील लोक हेच सार्वभौम असतात. आपल्याला आपल्या दुश्मनासोबत लढायचे आहे, ही लढाई आता राजकिय राहिलेली नाही, ही लढाई विशिष्ट क्षेत्रापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ही लढाई संपूर्ण बहुजन भारतीयांच्या अस्तित्वाची लढाई बनलेली आहे. बहुजन भारतीयांना मनुवाद्यांच्या गुलामगिरीपासुन वाचविण्याची ही लढाई आहे. ही लढाई जनसामान्य लोकांची लढाई झालेली आहे. या लढाईमध्ये गावांगावातील प्रत्येक जनसामान्य माणसाला सामील करावे लागेल. गावांगावातील ग्रामसेवक, सरपंच व सर्व पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समितिचे सर्व पदाधिकारी, गावांगावातील आशावर्कर, नर्स, डॉक्टर, रोजगार सेवक, सर्व शिक्षक, आंगणवाडी सेविका, मदतनिस, सुशिक्षित बेरोजगार, सर्व शिक्षित व सर्व अशिक्षित लोक, किसान, कामगार व विशेष म्हणजे गावांगावातील प्रत्येक महिला या सर्वांना या लढाईत सामिल करावे लागेल. तसेच शाळेत जाणाऱ्या गावांगावातील प्रत्येक विद्यार्थ्यांना या शाळा वाचविण्याच्या आंदोलनात सहभागी करावे लागेल. प्रत्येक गावांतील शाळेत व आंगणवाडीत जाणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या पालकांचा बहुजन मुलनिवासी पालक संघ तयार करून मनुवाद्यांच्या विरोधात मोठा जनांदोलन उभा करावा लागेल. असे आपण नक्कीच करू शकतो. आज पासुनच आपल्या गांवातील प्रत्येक पालकांना, पदाधिकाऱ्यांना, कंत्राटसेवकांना, प्रत्येक कर्मचाऱ्यांना, गावांगावातील प्रत्येक जनसामान्य लोकांना, प्रत्येक महिलांना, प्रत्येक विद्यार्थ्यांना मनुवादी दुश्मनाच्या या कट कारस्थानाची महिती द्या, सर्वांना वास्तविकता समजावुन सांगा...

शासनाचा जनवरी 2024 चा जि.प. व सर्वच सरकारी शाळा दत्तक योजनेच्या नावावर प्रायव्हेट कंपन्यांना विकणारा व सर्व सरकारी पदे प्रायव्हेट कंपन्यांमार्फत भरुन वेठबिगारी लादणारा काळा जरीआर गांवागांवातील प्रत्येक व्यक्तिंनी, जनसामान्य लोकांनी पेटवुन, काळ्या जीआरची प्रतिकात्मक होळी करून त्याचे व्हिडिओ, फोटो वॉट्सएप, फेसबुक व सोशल मिडिया वर शेअर करून मनुवाद्यांच्या या काळ्या जीआरचा निषेध नोंदवावा.. या जनआंदोलनात सर्व जनसामान्य बहुजन लोकांना सामिल करा... काळा जीआर पेटविण्याची ही आग सरकारपर्यंत पोहचली पाहिजे असे करण्यात जर आपण सफल झालो तर सरकारला या जनआंदोलना पुढे झुकावेच लागेल, हे लिहुन ठेवा... सर्वच बहुजन भारतीयांनी आपले अस्तित्व वाचविण्याकरिता, आपल्या मुलांचे भविष्य वाचविण्याकरिता, आपले स्वाभिमान वाचविण्याकरिता, आपली पिढी वाचविण्याकरीता, आपली नोकरी वाचविण्याकरिता, आपला देश वाचविण्याकरिता, आपले स्वतंत्र वाचविण्याकरिता या काळा जीआर जलाओ आंदोलनात प्रत्येक गावांतील प्रत्येक व्यक्तिला सहभागी करून मोठ्या प्रमाणात आपला निषेध नोंदवुन हे आंदोलन भरघोष सफल करावे... हेच सर्वांनाच आव्हान... ■ ■

– बसौसे

# आमची आगळी वेगळी किटी

***आजकाल जिकडे तिकडे किटीचे फॅड सुरू आहे. आम्हाला किटी काय असते हे माहीत नाही. आम्हाला भिसी माहीत होती. आमच्या आईच्या काळापासून भिसी माहीत होती. तेव्हा बायका भिसी भरायचे, दरमहा ठराविक रक्कम महिला जमा करायच्या आणि दरमहा एकीचा नंबर लागायचा. ती महिला त्यांच्या घरातील अडचणी, सोने, लग्न, कार्यक्रम, सणवार सर्व त्या पैशातून करायच्या. अडीअडचणीला ही भिसी कामात यायची.***

कालांतराने या भिसीचे स्वरूप बदलले आणि एन्जॉयमेंटचे स्वरूप घेतले. नातलगात, मित्र-मैत्रिणीत, भिसी मोठ्या प्रमाणात व्हायला लागल्या. महिन्याततून एकदा सर्व भेटायचे. ज्यांचा नंबर लागला त्यांच्या घरी किंवा ते ठरवणार ते ठिकाण, मग ते हॉटेल असेल अथवा अन्य कोणतेही ठिकाण. मस्त मेजवानी, नवनवीन खाद्य पदार्थांची चंगळ मंगळ, एकावर एक वरचढ असे पदार्थ दरमहा भिसी पार्टीमध्ये देण्याची महिलांमध्ये स्पर्धा असते. त्यात




भर म्हणजे एक रंगाचे कपडे. महिलांच्या एक रंगांच्या साड्या अथवा कपड्यांचा पॅटर्न.

काही भिसींमध्ये पारिवारिक मिलन असते. काही ठिकाणी नवरा बायको दोघेही मुलाबाळांसोबत या पार्टीचा आनंद घेताना दिसतात. तर काही ठिकाणी महिलाच गेम खेळून, गाणे गाऊन, डान्स करून ही भिसी पार्टी साजरी करताना दिसतात. ज्या महिलांना वाचनाची आवड आहे त्या महिला 'पुस्तकांची भिसी' करतात. दरमहा पैसे जमा करून त्या पैशात पुस्तके विकत घेतात. काही महिला प्रत्येक भिसीमध्ये महिनाभर सदस्यांनी ठराविक पुस्तके वाचावीत आणि भिसीच्या दिवशी त्या पुस्तकावर चर्चा करायची, असा सुद्धा भिसी प्रकार सुरू आहे. यापेक्षा आमची भिसी, किंवा किटी म्हणू आजच्या भाषेत ही फार वेगळी आहे. 'आंबेडकराईट हेल्प गृप'च्या नावाखाली आम्ही काही मैत्रिणींनी 2 फेब्रुवारी 2021 रोजी ही किटी सुरू केली. सुरुवातीला फक्त 13 सदस्य होतो. 12 महिला एक पुरुष सदस्य. महिन्याला फक्त 100 रुपये जमा करायचे. त्या पैशातून ना किटी पार्टी, ना जेवण, ना गेम्स किंवा त्या भिसीचे पैसे कोणताही सदस्य घेत नाही. या किटीचा एकमेव उद्देश म्हणजे गरजवंतांना मदत करणे. दान भावनेतून सुरू करण्यात आलेली ही किटी आहे. जमा झालेल्या पैशातून गरजू लोकांना मदत करणे. आज आमच्या किटीमध्ये जवळपास पन्नास सदस्य आहेत. प्रत्येक जण न चुकता दरमहा 100 रुपये देत असतात. आमची किटी पार्टी म्हणजे एखाद्या गरजवंताला मदत करून त्याच्या चेहऱ्यावरील समाधान, हीच आमच्या गृपसाठी मोठी मोठी पार्टी आहे.

या चार वर्षाच्या कार्यकाळात अनेक लोकांना मदत केली आहे. गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण करण्यास आर्थिक मदत, कोरोना काळात उपचारासाठी, बेलतरोडी झोपडपट्टीला लागलेल्या आगीत भस्म झालेल्या चाळीस घरांना रसद, भांडीकुंडी, चादर, बेडशीट अशी मदत केली.

बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथावर प्रश्नमंजुषा घेऊन विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. त्याचप्रमाणे दोन वाचनालये सुरू करण्यात आलेली आहेत. नालंदा वाचनालय, निर्मल कॉलनी, येथे स्पर्धा परीक्षांचे वर्ग दर शनिवार रविवार घेण्यात येतात. त्याचप्रमाणे तथागत धम्म विहार विश्वकर्मा नगर, नागपूर येथील महात्मा फुले वाचनालयाच्या स्पर्धा परीक्षांचे पुस्तके दान करण्यात आली आहेत. ही अशी आमची किटी. समाजाची परतफेड करण्यासाठी. अशीच आणखी एक भिसी दुसऱ्या एक सदस्याने सुरू केली. आदिवासी राहतात अशा दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन त्यांचा शैक्षणिक खर्च पूर्ण करणे हा उद्देश आहे. सर्वच सदस्य उत्साहाने महिन्याची एक तारीख आली तेव्हापासून भिसी जमा करतात. गरज पडल्यास अधिकची आर्थिक मदत सदस्य करीत असतात. सर्व समाधानाने या किटीमध्ये सहभागी आहेत. आज सत्तेचाळीस सदस्यांपैकी फक्त चार पुरुष सदस्य आहेत. उर्वरीत महिला सदस्य आहेत. दिवसेंदिवस सदस्य संख्या वाढत आहे. आम्ही आणखी गरजवंतांच्या कामात येऊ. आजच्या भाषेत किटी जर म्हणत असू तर खऱ्या अर्थाने आंबेडकराईट हेल्प गृप म्हणजे 'जिथे गरज तिथे आम्ही'. हा गृप सुरू करण्यास उज्वला गणवीर, सरिता सातारडे, सूरज तळवटकर, मीना बागडे, प्रतिभा सहारे, डॉ.अलका ढोके, अपेक्षा अमीन दिवाण, डॉ. माया पवार, कोकिळा वानखेडे, सविता धमगाये, डॉ. योगिता बन्सोड, प्रज्ञा सातरडे यांनी हा गृप सुरू करण्यास प्रयत्न केले. ■ ■

– उज्वला गणवीर

# लांघा येथे बुद्ध प्रतिमेचे अनावरण



**पांढुर्णा :** जिल्ह्यातील ग्राम लांघा येथे दि. 4 मई 2025 ला मैत्रेय तथागत बुद्ध विहारात थाईलैंड वरुन आलेल्या बुद्ध प्रतिमेचे अनावरण भिक्खु सारिपुत्र यांच्या हस्ते सम्पन्न झाले. त्यानंतर डॉ. अशोकानंद देशभ्रतार यांच्या अध्यक्षतेत कार्यक्रम संपन्न झाला. प्रथम भिक्खु सारिपुत्र यांनी बौद्ध धम्म लोकांकरिता कसा कल्याणकारक आहे याबद्दल विस्तृतपणे मांडणी केली. डॉ. अशोकानंद देशभ्रतार यांनी आपले अध्यक्षीय उद्‌गार व्यक्त करतांना म्हणाले की, 'भगवान बुद्धाच्या महापरिनिर्वाणानंतर धम्मात अनेक पंथ निर्माण झाले, त्यामुळे लोकांचा भ्रम दूर करण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेला ग्रंथ भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म यास प्राध्यान्य देवून बुद्धाने उपदेशलेला कलाम सुत्त आचरणात आणावे.' कार्यक्रमाला मुख्य अतिथी म्हणून लाभलेले से.नि. जिलाधिकारी विश्वासराव मेश्राम यांनी बुद्धाचा अनित्य सिद्धांत विशद केला. या प्रसंगी विशेष अतिथी डॉ. प्रा. गौतम कांबले म्हणाले की 'बुद्धिम ही जीवनशैली आहे. कुशल व्यवहार आणि नैतिक आचरण यातच बुद्धिमची संकल्पना साकारलेली आहे.' भारिपाचे महासचिव डॉ. व्ही.जी. बागडे म्हणाले की 'नावाप्रमाने मैत्रेय बुद्ध विहार, मैत्रीभाव प्रस्थापित करणे अगत्याचे आहे. तरुणांच्या उत्थानाच्या दृष्टिने कार्यक्रम राबवावे.' भारिपा चे राष्ट्रीय उपाध्यक्ष जनार्धन लोखंडे आपल्या दीर्घ भाषणात म्हणाले की 'आज बहुजन उत्पीडित होत आहे, हे लक्षात घेता बहुजनांनी एकता साधुन संघर्ष करावा.' भारतीय बौद्ध महासभा छिंदवाडा चे अध्यक्ष नरेन्द्र पाटील म्हणाले की, 'आमच्या महापुरुषांची जयंती बँडबाजा, डीजे चा कल्लोळ न करता प्रबोधनाने साजरी करावी.' कार्यक्रमाच्या प्रारंभी मैत्रेय तथागत बुद्ध विहार समितीचे अध्यक्ष से.नि. प्राचार्य जीवनलाल देशभ्रतार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस.पी. देशभ्रतार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिलीप कुमार देशभ्रतार यांच्या तर्फे लांघा निवासी नुकत्याच झालेल्या चार डॉक्टर मुली डॉ. दीपाली देशभ्रतार, डॉ. मृणालि देशभ्रतार, डॉ. शिल्पा सोमकुवर, डॉ. सोनल देशभ्रतार यांना अध्यक्षाच्या हस्ते स्मृतिचिन्ह देवुन पुरुस्कृत केले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन आनंद शेंडे यांनी केले. सर्वांचे आभार ऋषिकुमार देशभ्रतार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सुभाष देशभ्रतार, सुनंदा देशभ्रतार, माधुरी पाटील, रमा देशभ्रतार, शेषराव पंचभाई, नितुपाल आणि शिशुपाल यांनी बरेच परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता सुस्वादु भोजनानी झाली.

## प्रा. वृषाली वाघ यांचा सत्कार



**हिंगणा :** अबॅकस हे असे शिक्षण आहे की, अबॅकसच्या शिक्षणामुळे मुलांची बुद्धिमत्ता वाढते व ते बौद्धिक क्षमता वाढविण्याचे जगप्रसिद्ध उत्तम साधन आहे. तेंव्हा पालकांनी आपल्या मुलांना शालेय शिक्षणासोबतच अबॅकसचे शिक्षण सुद्धा देण्याचे आवाहन आरोही ब्राइट फ्युचर अकॅडमी, वानाडोंगरी येथिल संचालिका प्रा. वृषाली वाघ यांनी केले. वानाडोंगरी येथिल एबिएफ अबॅकस अकॅडमी येथे आयोजित राष्ट्रीय नॅशनल प्रतियोगितेचा बक्षीस वितरण सोहळा पार पडला. याप्रसंगी विनायक इंगळे गुरुजी, गजानन ढाकुलकर व नामदेव दंडाळे हे प्रमुख पाहुणे होते. या प्रतियोगितेमध्ये देशातील महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, ओडीसा, राजस्थान, गुजरात इत्यादी राज्यातून 320 विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी उपस्थित विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते शिल्ड, मेडल आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी एबिएफ अबॅकस अकॅडमीच्या संचालिका प्रा. वृषाली वाघ यांचा स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. अबॅकस हे बौद्धिक क्षमता वाढविण्याचे उत्तम साधन आहे. या सर्व प्रतियोगीतेत यश प्राप्त करण्यात आलेला नागपूरचा आदित्य वाघ एबीएफ अकॅडमीचा विद्यार्थी ठरला आहे. तसेच यथार्थ साठे या विद्यार्थ्याला एक्सीलेंस अकॅडमीक अवॉर्ड आणि अभय श्रीवास्तव यांना बेस्ट टीचर पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच लावण्य डाफ यालाही विशेष प्राविण्य प्राप्त करून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लावण्य डाफ यांनी तर संचालन व आभार प्रदर्शन आदित्य वाघ आणि रुशांक दामोदर यांनी केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक वृंद व पालक वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



रमाईचे स्वप्न - ७७

## बोधिमग्गो महाविहार, भीमनगर, ईसासनी

हिंगणा रोड येथे 1990 मध्ये परिनिब्बुत पुज्य भदन्त बोधिविनीत महास्थविर यांनी खडकाळ आणि वस्ती विरहित नागरी सुविधा पासुन वंचित असलेल्या भागात बोधीमग्गो सेवा संस्थाच्या माध्यमातून सुरु केलेल्या महाविहार जिथे आज दोन माळ्याचे प्रशस्त विहार आहे. शंभर बाय, शंभरचे असून दोन मोठे सभागृह, ध्यान साधना सभागृह, भिक्खू निवास, कम्युनिटी किचन, ग्रंथालय, वाचनालय आहे. परिसरात पर्यावरण संवर्धन आणि पर्यटन पुरक वातावरण असून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय सभा संमेलन भिक्खू सोबतच प्रेरणादायी उपक्रम, प्रकल्प राबविण्यात येतात.

संवाद मित्र, भदंत नागदिपंकर महास्थविर
मो.9423605550

## महत्वाचे

### श्रीलंका येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर धम्मा स्कूलला 15000 रुपये दान

**नागपूर :** बौद्ध इतिहास संस्कृती आणि संशोधन संस्था नागार्जुन संग्रहालयच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष भदंत नागदिपंकर महास्थविर यांनी पंधरा हजार रुपये प्रथम वर्धापन दिन निमित्त श्रीलंका येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर बुद्धिस्ट धम्मा स्कूलला दान दिले. या पूर्वी त्यांनी विस हजार रुपये हरदास नगर अर्बन क्रेडिट को ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नागपूरच्यावतीने दान पाठविले होत. श्रीलंका येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने प्रथम धम्मास्कूल स्थापित करण्यात आले असून या धम्मास्कूल परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय स्थापित करण्यात येणार आहे. त्या करिता बोधीमग्गो सेवा संस्था बोधीमग्गो महाविहारच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संपूर्ण भाषण खंड पाठविण्यात आले आहे. आणखी इतर इंग्रजी साहित्य पाठविण्यात येणार आहे असे प्रसिद्ध पत्रकाद्वारे कळविले आहे.

### साहित्यिक राष्ट्रपाल भा. सावंत यांना राज्यस्तरीय कोकण गौरव पुरस्कार



**चिपळूण :** हुतात्मा अपंग बहुउद्देशीय विकास कल्याणकारी संस्था कराड, कार्यक्षेत्र संपूर्ण भारत यांचा अकरावा राज्यस्तरीय कोकण गौरव पुरस्कार 2025सालात साहित्य क्षेत्रात केलेल्या कार्याचा गौरव म्हणून 'साहित्यरत्न' हा पुरस्कार सोहळा कोकण कृषी विद्यापीठात दापोली येथे कुलगुरूंच्या उपस्थितीत झाला. या कार्यक्रमाला उपस्थित राहू न शकल्याने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुनिल फडतरे आणि कार्यकर्ते निवेदक अमित आदावडे यांनी सन्मानपूर्वक हा पुरस्कार चिपळूण नगर परिषद, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय आणि लोकमान्य टिळक स्मारक वाचन मंदिर चिपळूणच्या संयुक्तपणे राबवित असलेल्या वाचू आनंदें न.प.चिपळूणचे मुख्याधिकारी विशाल भोसले यांच्या हस्ते प्रदान केला. साहित्यिक राष्ट्रपाल भागुराम सावंत यांना नुकताच चिपळूण येथे प्रदान केला.

### श्री शिवाजी सायन्स कॉलेजला वॉटर कूलर भेट



**नागपूर :** शिवाजी सायन्स कॉलेज कांग्रेस नगरला महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचारींकरीता छत्रपति शिवाजी विद्यार्थी संघा तर्फे उन्हाळ्यात थंड पानी पिण्याकरीता वॉटर कूलर भेट म्हणून देण्यात आले. या वेळेस तिथे महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. ओमराज देशमुख प्रामुख्याने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या भेट वर त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक ही केले. यावेळी महाविद्यालय अध्यक्ष अभिलाषा महंत कार्यकारी अध्यक्ष यशस्वी कोल्हे, सलोनी राउत, अभय सिंग, नंदिनी वागळे, मीत खापेकर, अदिति गुरवे, जान्हवी कुडकेलवार, पलग बागडे खुशी झा, नेहा अष्ठिकर, धनश्री चौहान व शहर अध्यक्ष रोहन दरोडे उपस्थित होते.

### आळसना येथे कर्मकांडाचे विद्यापीठ तयार होणार



**नागपूर :** आळसना ता. शेगांव जिल्हा बुलढाणा या गावी दोन एकरमधे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रम सेवाभावी ट्रस्टच्यावतीने कर्मकांडांच शास्त्रोक्त प्रशिक्षण देणार अद्यावत विद्यापिठ तयार होत आहे. या ट्रस्टच्यावतीने परंपरागत विधी संस्कार, पुजा शिकविल्या जाणार आहे. शिवपुराण, संतोषी माता व्रत, कालसर्प पुजा, नवग्रह शांती याचे विशेष प्रशिक्षण वर्ग घेतले जातील. मंत्रोपचार व यज्ञ करुन विधीवत पिंडीची स्थापना करण्यात आला. यासाठी गुरुकुंजातील मान्यता प्राप्त राष्ट्रीय कीर्तनकार, भागवतकार, तज्ञ मडंळी सेवा देणार आहे. भव्य अद्यावत भक्त निवास, गोरक्षण, वाहनतळ असणार आहे. वरील ट्रस्ट अ.भा.श्री गुरुदेव सेवामंडळाची अर्तंगत शाखा म्हणून कार्य करणार आहे. अ.भा.गुरुदेव सेवा मंडळाची मोठी उपलब्धी म्हणावी.

## निधन वार्ता

### रमेशराव सदाशिवराव



**नागपूर :** मराठा विद्या प्रसारक समाजाचे आजिव सभासद रमेशराव सदाशिवराव सस्ते (वय 70 वर्षे) यांचे निधन झाले असून त्यांचे वर गंगाबाई घाटावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आले.

### प्रमोद एकनाथ गावंडे



**नागपूर :** वैशाली नगर येथील रहिवासी प्रमोद एकनाथ गावंडे सेवानिवृत्त रेल्वे कर्मचारी यांचे हृदयविकाराच्या झटक्यामुळे निधन झाले. मृत्युसमयी ते 58 वर्षाचे होते. अंतिम संस्कार बारसे घाटावर करण्यात आले. त्यांच्या पश्चात भरपूर मोठा परिवार आहे

## महाअंनिसचा सामाजिक समता सप्ताह आश्रमशाळा बेलदा येथे प्रबोधन शिबिर



**नागपूर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती तर्फे सामाजिक समता व अंधश्रद्धा निर्मूलनार्थ अनिष्ठ अघोरी प्रथा जादूटोणा प्रतिबंध कायदा प्रबोधन कार्यक्रम अंतर्गत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नागपूर व शासकिय माध्यमिक व उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालय आश्रमशाळा, ग्राम बेलदा, देवलापार, तहसील रामटेक, जिल्हा नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने येथे 'सामाजिक समता सप्ताहा'चे निमित्ताने वैज्ञानिक जाणिवा प्रायोगिक उकल व अनिष्ट अघोरी प्रथा जादूटोणा प्रतिबंध कायदा 2013 जनजागृती प्रबोधन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापक सतीश छपाने यांनी समयोचित अंधश्रद्धा निर्मूलनाची ग्रामीण भागात कशी आवश्यकता आहे यावर मार्गदर्शन केले. जिल्हा वैज्ञानिक जाणीव प्रकल्प कार्यवाह देवयानी भगत यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची 36 वर्षाची चळवळीची वाटचाल विषद केली. सामाजिक सलोख्याने, एकत्र येऊन अंधश्रद्धा निर्मूलन कायदा प्रबोधन व ज्वलंत प्रश्न निराकरण करणे, हे ग्रामीण, शहरी भागात खूप महत्त्वाचे व गरजेचे आहे, शाळा, कॉलेज, आश्रम शाळा, पोलिस स्टेशन, ग्रामपंचायत, नगर परिषद, सामाजिक न्याय विभाग येथील कर्मचारी, जनसेवक, सरपंच, पोलीस पाटील, आशा वर्कर, सोबत प्रबोधन शिबीर घेऊन, यांना अनिष्ठ अघोरी प्रथा, जादू प्रतिबंध कायदा 2013 माहिती व प्रबोधन, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती खेड्यात, आदिवासी दुर्गम भागात जाऊन वैज्ञानिक दृष्टीकोन चर्चा व प्रयोग सादर करते असे स्पष्ट केले. जिल्हा प्रधान सचिव प्रा. डॉ. सुनील भगत, देवयानी भगत आणि सुषमा शेवडे आणि मंगला गाणार यांनी 'बोला या मिळूनी सारे हा निश्चय करू या रे', 'माझ्या भारत देशात कोणी कितीही शिकला', 'डोळे उघडून बघा गड्यानो झापड लावू नका' ही चळवळीची गीते सादर केलीत. महाराष्ट्र अनिस प्रधान सचिव, दक्षिण शाखा, मंगला गाणार यांनी संविधान प्रास्ताविक वाचन केले. प्रा. डॉ. सुनील भगत यांनी अनिष्ट अघोरी प्रथा जादूटोणा प्रतिबंध कायदा 2013 अंधश्रद्धा निर्मूलन जनजागृती प्रबोधन केले. 'चमत्कार सादरीकरण प्रा. डॉ. सुनील भगत, देवयानी भगत, सुषमा शेवडे आणि मंगला गाणार यांनी केले आणि विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल निर्माण केले. कार्यक्रमाचे संचालन देवयानी भगत तर आभार प्रदर्शन शिक्षिका सीमा लेंडे यांनी केले. कार्यक्रमासाठी मुख्याध्यापक सतीश छपाने व महिला अधिक्षिका स्वाती पांडे अथक परिश्रम घेतलेत.

कार्यक्रमाला बेलदा, नवेगांव, कोलीतमारा आश्रमशाळा येथील शिक्षक केंद्रे, राजेश फुंडे, प्रशांत लिल्हारे, लांजेवार, प्रीती बोरकर, सुनीता बनसोड, सुनीता वाघ, सुवर्णा आसरवार, ज्योती खंते, सीमा लेंडे, उषा सोनटक्के, नलिनी मरसकोल्हे आणि तिन्ही आश्रम शाळेतील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिकचे जवळपास 200 विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि सहचारिका, वॉर्डन उपस्थित होते.

## बीआरएसपीचा विविध मागण्यांसाठी मोर्चा




**नागपूर :** बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टीच्या नागपूर जिल्हा शाखेतर्फे आज जनतेच्या ज्वलंत समस्यांविरोधात इंदोरा चौक येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. नागपूर महानगरपालिकेतील अस्थायी ऐवजदारांना नियमित करण्यात यावे, इलेक्ट्रीक प्रिपेड स्मार्ट मिटर रद्द करण्यात यावे, जीवनावश्यक वस्तुंवर जीएसटी रद्द करण्यात यावी, झोपडपट्टीतील रहिवाशांना कायमस्वरूपी मालकी पट्टे देण्यात यावे, झोपडपट्टीतील रहिवाशांना रस्ते, वीज, पाणी, आधुनिक वाचनालय इत्यादी सोयी उपलब्ध करून देण्यात याव्यात इत्यादी मागण्यांसाठी काढण्यात आलेल्या या मोर्चाचे संविधान चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याजवळ सभेत रूपांतर करण्यात आले. बी आर एस पी चे राष्ट्रीय उपाध्यक्ष रमेश पाटील, महिला आघाडी नेत्या विश्रांती झांबरे, सी.टी. बोरकर, पंजाबराव मेश्राम, मोरध्वज अढाऊ, शोभा तिरपुडे, संतोष ठवरे यांनी मोर्चाला संबोधित केले.जिल्हाध्यक्ष डॉ. विनोद रंगारी यांच्या नेतृत्वाखाली रवि देशभ्रतार, रफिक शेख, वंदना लांजेवार, अनिल गरडकर, सुनंदा गायकवाड यांचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

## तांडापेठ-लालगंज येथील शिबिराचे उद्घाटन



**नागपूर :** आदिम संशोधन-अध्ययन मंडळ व अस्तित्व क्रियेशन आणि एज्युकेशन एम्पायरमेंट ऑफ अंडरप्रिवीलेज्ड गर्ल्स फाऊंडेशन, नागपूर यांच्या संयुक्त प्रयासाने मागासवर्गीय स्लम वस्तीतील गरीब व गरजू विद्यार्थीचे व्यक्तीमत्व विकास शिबीराचे (15 दिवसांचे) आयोजन करण्यात आले होते. दि. 04 मे रोजी तांडापेठ येथील नवशक्ती विद्यालयाच्या सभागृहात झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते वासुदेव वाकोडीकर होते. तर शिबिराचे उद्घाटन चंद्रकांत वैद्य यांचे हस्ते पार पडले. याप्रसंगी मुख्य अतिथी म्हणून ओमप्रकाश पाठराबे, विनायक वाघ, किशोर पाटणकर, शंकरराव बुरडे, नरेश बोकडे आणि हलबा समाज पारंपरिक मंडळाचे प्रा. नरेंद्र सोरते, राजेंद्र फनिभरे, दशरथ गहाणे, अशोक खापेकर, बळीराम पराते, बलवंत मेश्राम, नगरसेवक भास्कर पराते, नगरसेवक विलास पराते, विजय भनारकर, निखारे, निकीता मोहाडीकर, आदित्य पौनिकर, अंकुश धकाते, विष्णु भनारकर, हरेश निमजे, पुजा खडगी, राहुल मौदेकर, कोमल पिंपळघरे, मयूर मौदेकर इत्यादींची प्रमुख उपस्थितीत होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश निमजे यांनी केले,तर संचालन शेफाली बोरकर (बोकडे) हिने केले.

## सेवानिवृत्त शिक्षकांचा गौरव सोहळा



**पुलगाव :** इंटरनॅशनल बुद्धिस्ट मिशन ट्रस्टद्वारा संचालित बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर पब्लिक स्कूल, गूंजखेडा पुलगाव येथे आयोजित एका गौरव समारंभात तीन मान्यवरांची सेवानिवृत्तीच्या निमित्ताने गौरवमयी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात लता चंद्रसेन डोंगरे (मुख्याध्यापिका, ज्ञानभारती हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुलगाव), आनंद नामदेवराव जीवने (मुख्याध्यापक, आर. के. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, पुलगाव) आणि ई. संदीप करोडे (कार्यदेशक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर) यांचा त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याच्या गौरवार्थ सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष इंटरनॅशनल बुद्धिस्ट मिशन ट्रस्टचे चेअरमन सोहनलाल गिडाजी होते. कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध व बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना माल्यार्पण व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. अध्यक्ष सोहनलाल गिडाजी यांचे स्वागत रमेश गायकवाड यांनी शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन केले. सत्कारमूर्ती लता चंद्रसेन डोंगरे, आनंद जीवने, इंजि. संदीप करोडे यांनी आपल्या मनोगतातून आपली शैक्षणिक वाटचाल, सामाजिक योगदान आणि अनुभव मांडले. या प्रसंगी मंचावर डॉ. ओंकार वानखेडे, आर्किटेक्ट अंकित तागडे, डॉ. सुभाष खंडारे, डॉ. सुहास खंडारे, रंजना जीवणे व श्रेयस करोडे इत्यादींचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमात सत्कारमूर्तींचे स्वागत व शुभेच्छा डॉ. सुभाष खंडारे, डॉ. सुहास खंडारे, नरसिंह जाधव, विठ्ठल वानखेडे, विनोद सावसाकडे, प्रशांत इंगोले, प्रदीप पागोटे, कपिल ढोबळे, सुबेदार सुनील मोहोड, ज्योती मोहोड, मधुरंग नांदेकर (समता सैनिक दल), नंदकिशोर व वर्षा पाडेन (बामसेफ), मानिक डोंगरे, अश्विन जांभूळकर (महाबँक, नागपूर), डॉ. गौतम कांबळे, संदीप व निलेश धोमणे (वैष्णो ज्वेलर्स), संघमित्रा पाटील, राजकुमार बेलसरे, नारायण भगत, देवानंद गायगवली, ई. भारत रंगारी, रमेश गायकवाड, हेमलता शंभरकर, डॉ. प्रिया कदम, सविता भगत, दिलीप टेंभुर्णे, मनोज टेंभुर्णे, प्रदीप कांबळे, चुन्नीलाल झाडे, ज्ञान भारती स्कूल कडून सुनीता भुरकुंडे, सुनील सिलसकर, नरेंद्र गडेकर, संजय कुंभारे, रवींद्र कुडुपले, नंदकिशोर बीजागरे, प्रीतीबाला दुबे, ॲड. अभिजीत बाभले, प्रणाली बाभले, आलेख पठाडे, प्राचार्या उज्ज्वला दिघाडे व पूनम वडालकर यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. शैलेश कदम यांनी केले व सत्कारमूर्तींच्या गौरवपत्राचे वाचन डॉ. प्रिया कदम यांनी केले.

## भारतीय बौद्ध महासभा स्थापना दिवस साजरा



**नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा नागपूर शहर अंतर्गत, भारतीय बौद्ध महासभा स्थापना दिवस साजरा करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माचा प्रचार प्रसार आणि बौद्ध धर्म जनमानसात रुजविण्यासाठी दि बुध्दिष्ट सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेची स्थापना केली. संस्थेचा वर्धापन दिवस समारोह स्वयं दिप बुद्ध विहार सिम टाकळी येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मिलिंद डांगे, शहर अध्यक्ष होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून शहर उपाध्यक्ष हरिदास बेलेकर, विदर्भ उपाध्यक्ष रमा वासनिक, दिगंबर बनकर, गोपीचंद अंभोरे, मनोहर उके होते. प्रमूख पाहुणे हरिदास बेलेकर यांनी भारतीय बौद्ध महासभेचे उद्दीष्ट व कार्य आणि आजची परिस्थिती व दर रविवारी उपासकांनी विहारात येऊन धम्म श्रवण करावे विषयी मनोगत व्यक्त केले. रमा वासनिक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मिलिंद डांगे यांनी अध्यक्षीय भाषणात म्हणाले की धम्म प्रचारात संस्कार रुजविण्यासाठी भारतीय बौद्ध महासभा नेहमी कार्यरत आहे. या कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती अभिवादन स्पर्धा परीक्षेत सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे संचालन रेखा नितनवरे यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. बी. पी. कोचे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शहर महासचिव मनोहर उके, कल्पना बनकर व विहार समितीचे पदाधिकारी परिश्रम घेतले.

## 'रंग बावरी' ठरले महावितरणच्या नाट्यस्पर्धेत 'सर्वोत्कृष्ट'



'सिकॅरिअस'ने पटकावले उपविजेतेपद

**चंद्रपूर :** महावितरणच्या नागपूर प्रादेशिक आंतरपरिमंडलीय नाट्यस्पर्धेत चंद्रपूर परिमंडलाच्या 'रंग बावरी' या नाटकाने उत्कृष्ट अभिनयासह सर्वोत्कृष्ट नाटकाचा मान पटकावला. दोन दिवस रंगलेल्या या नाट्यकुंभ-2025 मध्ये 'रंग बावरी'ने विविध गटांमध्ये तब्बल सहा प्रथम पुरस्कारावर आपली मोहोर उमटवली. अकोला परिमंडलाच्या 'सिकॅरिअस' या नाटकाने उपविजेतेपद मिळवले.

या स्पर्धेतील विजेत्या कलाकारांना महावितरणचे संचालक (संचलन) अरविंद भादिकर आणि संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. नागपूर परिक्षेत्राचे प्रादेशिक संचालक परेश भागवत, मुख्य अभियंता सुहास रंगारी, दिलीप दोडके, ज्ञानेश कुलकर्णी, राजेश नाईक आणि स्वागताध्यक्ष हरिश गजबे यांच्यासह नाट्य परिक्षक विनोद दुर्गेपुरोहित, जयदेव सोमनाथे, ॲड. चैताली बोरकुटे यांसारखे उपस्थित होते. या सोहळ्यात बोलताना संचालक अरविंद भादिकर यांनी नाट्य कलाकारांचे कौतुक केले आणि स्पर्धेनंतरही त्यांनी एकमेकांशी संवाद कायम ठेवण्याचे आवाहन केले. संचालक प्रसाद रेशमे म्हणाले, 'जय-पराजय हा स्पर्धेचा भाग असला तरी, कलाकारांनी आपली कला सादर करताना मिळवलेला आनंद आणि रसिकांना दिलेला आनंद हेच त्यांचे खरे पारितोषिक आहे.' स्पर्धेचे अध्यक्ष तथा प्रादेशिक संचालक परेश भागवत यांनी नाटकांच्या माध्यमातून केवळ आनंदच नव्हे, तर अनेक अनुभव मिळाल्याचे मत व्यक्त केले. नाट्यकुंभ-2025 चे उद्घाटन महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांच्या शुभहस्ते झाले होते. 'नाट्यकुंभ' सारख्या स्पर्धांमुळे या कलाकारांना त्यांची प्रतिभा सादर करण्याची संधी मिळते. यासोबतच, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये सुसंवाद वाढतो आणि सांघिक भावना अधिक दृढ होते, असे मत त्यांनी व्यक्त केले. आपल्या भाषणातून राजेंद्र पवार यांनी विदर्भातील नाट्य परंपरेचाही विशेष उल्लेख केला. चंद्रपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता हरिश गजबे यांनी निर्मिती केलेल्या, श्रीपाद जोशी लिखित आणि संध्या चिवंडे दिग्दर्शित 'रंग बावरी' या नाटकाने रसिकांच्या मनाचा ठाव घेतला. राजेश नाईक निर्मित, डॉ. चंद्रकांत शिंदे लिखित आणि नितीन नांदुरकर दिग्दर्शित 'सिकॅरिअस' या सस्पेन्स थ्रिलर नाटकाने प्रेक्षकांना खिळवून ठेवले. नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके निर्मित, प्रदीप फाटक लिखित आणि हेमराज ढोके दिग्दर्शित 'ये रे घना' आणि गोंदिया परिमंडलाचे मुख्य अभियंता सुहास रंगारी निर्मित, अतुल साळवे लिखित व राजेंद्र गिरी दिग्दर्शित 'दि ॲनॉनिमस' या नाटकांनाही रसिकांचा चांगला प्रतिसाद लाभला. या नाट्यस्पर्धेसाठी अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर आणि गोंदिया परिमंडलातील वरिष्ठ अधिकारी आणि नाट्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**स्पर्धेचा अंतिम निकाल :- सर्वोत्तम नाटक, प्रथम - 'रंग बावरी' (चंद्रपूर परिमंडल), द्वितीय -'सिकॅरिअस' (अकोला परिमंडल), दिग्दर्शन - प्रथम - संध्या चिवंडे ('रंग बावरी'), द्वितीय - नितीन नांदुरकर ('सिकॅरिअस'), अभिनय (पुरुष) - प्रथम - गणेश राणे (रघुपती - 'सिकॅरिअस'), द्वितीय - सुमित खोरगडे (सुभाष - 'ये रे घना'), अभिनय (स्त्री) - प्रथम - रोहिणी ठाकरे (नेहा - 'रंग बावरी'), द्वितीय - स्नेहांजली तुंबडे (स्मिता - 'ये रे घना'), नेपथ्य - प्रथम - रमेश सानप ('रंग बावरी'), द्वितीय - गजानन जैवाल ('दि ॲनॉनिमस'), प्रकाश योजना - प्रथम - प्रकाश खांडेकर ('रंग बावरी'), द्वितीय - विवेकानंद वाध ('सिकॅरिअस'), पार्श्वसंगीत - प्रथम - राकेश बोरोवार ('रंग बावरी'), द्वितीय - योगेश सोनुने ('सिकॅरिअस'), रंगभूषा-वेशभूषा - प्रथम - पौर्णिमा कदम ('सिकॅरिअस'), द्वितीय - आनंद जैं ('दि ॲनॉनिमस'), उत्तेजनार्थ पारितोषिक - सामली सायंकाळ (मेधना - 'रंग बावरी'), अमित पेढेकर (डॉ. विध्वंस - 'ये रे घना'), नावेद शेख (जरासंघ - 'दि ॲनॉनिमस'), संतोष पाटील (इन्स्पेक्टर कश्यप - 'सिकॅरिअस')**

जाहिरात



प्रॉपर्टी घेणे विकणे भाड्याने देणे अधिक माहिती करिता

संपर्क
९३२५६२९६३५

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648